# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. 22 /२०१९

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ७९ अनुसार अध्यापक व कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण समितीचे गठन करण्यात आलेले आहे. तक्रार निवारण समितीने निर्णय दिल्यानंतर संबंधित संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. २ जानेवारी, २०१९ रोजी राजपत्र प्रसिद्ध करून अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ३१ (यज) व कलम ७२ (१०) अनुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ निर्गमित केला आहे.

सदर एकरूप परिनियमातील मुद्दा क्र. २ (९) नुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६) याच्या संबंधित तरतुदींअन्वये घटित करण्यात आलेल्या, विद्यापीठाच्या तक्रार निवारण कक्षाच्या निर्णयांची यथोचितरित्या व सत्वरतेने अंमलबजावणी करण्यात किंवा त्यांचे अनुपालन करण्यात हयगय केल्यास असे संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था त्यांचेविरूद्ध कारवाई करण्यास पात्र ठरतात.

उपरोक्त एकरूप परिनियमातील तरतूद विचारात घेता तक्रार निवारण समितीने जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाची अंमलबजावणी संबंधित संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी करणे आवश्यक आहे. तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न करणे ही बाब संलग्नीकरणाच्या शर्तीच्या अटींचा भंग झालेला आहे असे समजून सदर परिनियमातील मुद्दा क्र. ३ नुसार संबंधित संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेवर पुढील कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

८/२/२०१९

गणेशखिंड, पुणे-४११००७ )<br>
जा.क्र.सीसीओ /३०७ /२०१९ )<br>
दिनांक :०८ फेब्रुवारी, २०१९ )

उपकुलसचिव<br>
( शैक्षणिक विभाग )

प्रति :

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.

२) मा. संचालक, सर्व विद्यापीठ मान्यताप्राप्त परिसंस्था.